PIFF

10th Pune International Film Festival 2012

९ जानेवारी २०१२

कृपया प्रसिद्धीसाठी

## १० वा पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव

१० व्या पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचे गुरूवार दि. १२ जानेवारी रोजी सिटी प्राईड (कोथरूड) येथे सायंकाळी ४.३० वाजता महाराष्ट्राचे सांस्कृतिक मंत्री मा. संजय देवताळे यांच्या हस्ते शानदार उद्घाटन संपन्न होईल. या प्रसंगी आईसलंडचे भारतातले राजदूत गुडमुंड एरिकस्न व सिनेअभिनेत्री राणी मुखर्जी हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहतील. याप्रसंगी आंतरराष्ट्रीय ज्युरी, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय चित्रपट विश्वातील नामवंत विशेष निमंत्रित म्हणून उपस्थित राहतील. १० वा पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव दि. १२ ते १९ जानेवारी या कालावधीत पुणे फिल्म फाऊंडेशन आणि महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने संपन्न होत आहे.

चित्रपट क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या महान कलावंतांचा या चित्रपट महोत्सवात विशेष सन्मान केला जातो. भारतीय चित्रपट संगीतातील असामान्य कर्तृत्वाबद्दल यंदा पद्मविभूषण आशा भोसले यांचा विशेष सन्मान केला जात आहे. यापूर्वी मृणाल सेन, दिलीप कुमार, लता मंगेशकर, देव आनंद, वहिदा रेहमान, शक्ती सामंत, वैजयंती माला, यश चोप्रा, आशा पारेख, धर्मेंद्र, शर्मिला टागोर, शम्मी कपूर, शशी कपूर, सुलोचना दीदी, हेमा मालिनी, डॉ.श्रीराम लागू, राजेश खन्ना, शशिकला, सायरा बानू, यांना सन्मानित करण्यात आले आहे.

गेल्या २ वर्षांपासून या चित्रपट महोत्सवात दिला जाणारा 'सचिन देव बर्मन इंटरनॅशनल अवॉर्ड फॉर क्रिएटिव्ह म्युझिक अँड साऊंड' साठीचा सन्मान जागतिक कीर्तीचे संगीतकार पद्मभूषण ईलायराजा यांना देण्यात येणार आहे. यापूर्वीचा सन्मान हा ज्येष्ठ संगीतकार प्यारेलाल आणि प्रख्यात संगीतकार खय्याम यांना या प्रदान करण्यात आलेला होता. चित्रपट क्षेत्रातील ५० वर्षांची कारर्किद पूर्ण केलेले सचिन पिळगांवकर यांचा यावेळी विशेष गौरव केला जाणार आहे. ही यंदाच्या उद्घाटन सोहळ्याची मुख्य आकर्षणे आहेत.

उद्घाटन सोहळ्याची सुरवात ही नेहमीप्रमाणे वैशिष्टपूर्ण सांस्कृतिक कार्यक्रमाने होणार आहे. सोहळ्यानंतर फ्रान्सचा **टॉप फ्लोअर लेफ्ट विंग** हा अॅन्जिलीओ सियान्सी दिग्दर्शीत चित्रपट तेथेच उद्घाटनांचा चित्रपट म्हणून दाखविला जाईल.

१० व्या पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात सुमारे २४० चित्रपट दाखविले जाणार असून, सिटी प्राईड (कोथरुड), आर डेक्कन (डेक्कन जिमखाना), सिटी प्राईड अभिरुची (सिंहगड रोड), ई-स्क्वेअर(पुणे विद्यापाठी मार्ग), आयनॉक्स (कॅंप) व राष्ट्रीय चित्रपट संग्रहालय (लॉ कॉलेज मार्ग)- अशा एकूण ६ ठिकाणच्या १० स्क्रिन्सवर हे चित्रपट दाखविले जातील.

Pune Marathon Bhavan, Near Mitra Mandal Colony, Opp. Parvati P. O.,
Pune - 411009, India. Tel: +91 20 24424545, Fax: +91 20 24428788,
Email: piff.india@gmail.com Website: www.puneinternationalfilmfestival.com
R. No. : F - 24914 / Pune S/R. No. : MAH / 1325 / 2009 / Pune

ORGANIZED BY Pune Film Foundation

JOINTLY WITH Government of Maharashtra

महोत्सवास महाराष्ट्र शासनाचे सांस्कृतिक खाते, भारत सरकारचे माहिती व प्रसारण मंत्रालय, डायरेक्टोरेट ऑफ फिल्म फेस्टीव्हल-भारत सरकार, पुणे महानगरपालिका, राष्ट्रीय फिल्म संग्रहालय, फिल्म अॅन्ड टेलिव्हिजन इन्स्टीट्युट ऑफ इंडीया, मॅक्समुलर भवन, अलियांन्स दी फ्रान्से, अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळ, एन एफ डी सी, फिल्म डिव्हीजन, इन्को, भारतातील विविध देशांचे दूतावास अशा अनेक संस्था सहकार्य करतात. तसेच या महोत्सवासाठी अधिकृत विमानसेवा एअर इंडीया, अधिकृत कुरीयर- डि एच एल, अधिकृत बँक- बँक ऑफ महाराष्ट्र, रेडीयो पार्टनर-रेडीयो मिर्ची, आऊट डोअर पार्टनर- सिक्स्थ एलिमेंट, इंडडोअर पार्टनर शिवा, बिव्हरेज पार्टनर- कोका कोला, पंचशिल, एन ई सी सी हे प्रायोजक आहेत.

याची नावनोंदणी ऑनलाईन तसेच वरील चित्रपटगृहांपाशी सकाळी ११ ते सायंकाळी ६ या वेळेत सुरू असून, कॅटलॉग फी ५०० रूपये आहे तर विद्यार्थी, जेष्ठ नागरीक, सिनेकलावंत, फिल्मक्लब मेंबर यांना ३०० रुपये कॅटलॉग फी आहे.

महोत्सवाची अधिक माहिती संकेत स्थळwww.puneinternationalfilmfestival.com या वर उपलब्ध आहे.

कळावे,

आपला स्नेहांकित,

प्रवीण प्र. वाळिंबे

प्रवीण प्र. वाळिंबे
मीडिया को-ऑर्डिनेटर ९८२२४ ५४२३४ / ९४०५०३५४५८

Pune Marathon Bhavan, Near Mitra Mandal Colony, Opp. Parvati P. O., Pune - 411009, India. Tel: +91 20 24424545, Fax: +91 20 24428788,
Email: piff.india@gmail.com Website: www.puneinternationalfilmfestival.com
R. No. : F - 24814 / Pune S/R. No. : MAH / 1325 / 2009 / Pune